Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA






Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730
Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

ENGLISH / MARATHI PART - II / HINDI

Ajanta Prakashan

# राष्ट्रसंताची भजनावली - सामाजिक ऐक्याचा सांस्कृतिक वारसा

प्रा. रजनी आनंदराव काळे

तत्त्वज्ञान विभागप्रमुख

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती

मो.नं. ९३७३६७७२८८

Email:- rajanikale१९७४@gmail.com

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ ला तत्कालिन व-हाड प्रांतात अमरावती जिल्ह्यात यावली (शहीद) या गावी भाट जातीत अत्यंत गरीब घरात झाला. आई-वडिलांची साथ देखील त्यांना आजच्या आई-वडिलांसारखी मिळाली नाही. बाळ माणिकला तत्कालिन वर्णवादी, जातीवादी, धर्मवादी आणि शुद्रत्वाच्या काटेरी वाटा याचा सामना त्यांना बालपणापासूनच सोसावा लागला. त्यामुळेच बाळमाणीकचे कोवळे मन चिंतनाकडे वळले. आपले मनातील भावना सामाजिक औदासिन्य त्यांनी आपल्या भजनाव्दारे खंजिरीव्दारे व्यक्त केले. अशा प्रसंगामुळेच बाळ माणिकचे मन आयुष्याचे सारे सुक्ष्म व गुढ रहस्य शोधण्यास उत्सुक झाले. साहजिकच ते पुर्णपणे ध्यानाकडे वळले. ज्याला ध्यान लागते त्यालाच भान येते. अन भान आले की ज्ञान येते. मन आत्मचिंतनात मग्न होते.

## महाराज सुचवितात

अपने आतम के चिंतन में, हरदम जागृत रहना है।<br>
ओहं सोहं श्वाससे अपनी, अंनदृष्टी निरखना है।<br>
चंचल मन को बुद्धी विचारक शुद्धि सततही करना है।<br>
निश्चल वृत्ती की धारा, अंतमुखसे सिखना है।<br>
सहज समाधी चलते हलते, सब कामों में रखना है।<br>
विश्वरुप विश्वात्मक दृष्टी, अनासक्तीसे चखना है।<br>
इस मानव जीवन में इतनी मंजील चढकर जाना है।<br>
तुकड्यादास कहे यह वानी, रोज रोज ही गाना है।

वंदनीय महाराज याच विचारधारेने चालत राहीले. महाराज मनानी सुक्ष्म दृष्टीचे असल्याकारणाने ते रात्रंदिवस आत्मचिंतनात रंगून जात होते. 'लोकान्त में एकांत हो ऐसी करामत जानना' हेच त्यांच्या जीवनात पहावयास मिळते.

वंदनीय महाराज एका लेखात लिहीतात 'मित्रानों कोणतीही कृती करणे आपल्या हातीच आहे. निश्चयाचे बळ हे केवळ साधन नव्हे, तर ते प्रत्यक्ष फळच आहे निश्चय आपला आहे, तो करणारे ही आपणच आहे व त्याचे फळ ही आपणासच हवे आहे.' म्हणून ध्यास ज्याचा असेल त्याचेच ध्यान केले पाहिजे. बाल पणापासूनच वंदनीय महाराजांना ध्यानसाधना, भजन, किर्तन करायची सवय होती. भजन किर्तन करतांना त्यांना देहभानच नसायचे. जगातील सर्व संत महात्म्यांनी ईश्याराची प्रार्थना करण्याकरीता उपदेश केला आहे. सर्वच संप्रदायाचे अनुयायी त्याप्रमाणे प्रार्थना करीत

असतात. शब्द वेगवेगळे असतात. मात्र सर्व प्रार्थनेत एकच तत्त्व असते. याची जान व ज्ञान वंदनीय महाराजांना होती. म्हणूनच वयाच्या नवव्या वर्षीच सर्व धर्माची दिक्षा मी घेतलेली आहे असे एका पत्रात नमुद केले आहे.

(श्री गुरुदेव तत्त्वांक १९४४) सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी वंदनीय महाराजांनी सामुदायिक प्रार्थनेचा ध्यास आयुष्यभर धरला. त्यांनी दररोज गावोगावी व शहरातील मोहल्या-मोहल्यात सामुदायिक प्रार्थना १९३४ पासून सुरु केली. १९४५ साली तर चाळीस हजार सेवामंडळात सामुदायिक प्रार्थना सुरु झाली होती.

सदर शोध निबंधामधून वंदनीय राष्ट्रसंतानी त्यांच्या भजनावलीमधून सामाजिक ऐक्य कसे दृढ केले व त्यातूनच सांस्कृतिक वारसा जोपासला गेला हेच सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## सामुदायिक प्रार्थनेचे उद्दिष्ट

सामुदायिक प्रार्थनेचे व्यापक उद्देस सांगतांना वंदनीय महाराज सांगतात की, विस्कटलेल्या काळात संघटीतपणाने राहण्यातच आपल्या सत्यधर्माची इभ्रत आहे हे निश्चित समजूनच या सामुदायिक प्रार्थनेचा उपक्रम ठरलेला आहे. वेद वाङ्‌मयाच्या काळात ऋषिलोक निरनिराळ्या संघा संघाने वेद घोष करीत असत भगवंताची प्रार्थना समाजाच्या सुव्यवस्थेकरीता करीत असत. सर्व संप्रदायातील आदर्श महात्म्यांची वचने आदराने मनन करावी म्हणून ही सामुदायिक प्रार्थना करीत असत. परस्परांविषयी बंधुभावाने वागून आपआपल्या धर्माची ज्योत सदानसदा समाजात जागवावी यासाठीही सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व होते. सर्व धर्म, जात, पंथ यांनी सर्व मिळून केले जाते त्यास धर्म म्हणतात. ही भावना जागृत करुन जनतेत सुव्यवस्था निर्माण केली जावी. तसेच जनताजनार्धन कशी आहे याचे यर्थाथ ज्ञान आणि अफाट विश्वरुपाचे डोळ्यांनी व तत्त्वदृष्टीने दर्शन करुन देण्याकरीता म्हणून ही सामुदायिक प्रार्थना वंदनीय महाराज करीत असत. सामुदायिक प्रार्थनेचे महत्व विषद करीत असतांना त्यांनी धर्माचे आचरण आपल्या श्रेप्ठ पुर्वजांचे गुण गंभीर वातावरणाने प्रतिष्टीत तसेच सज्जनांच्या बोधवाणीने त्याला आपल्या कर्तव्याचा सदैव बोध व्हावा. तसेच भव्य मंदीरांना आदर्श स्थानाचे रुप देवून चांगले कार्य करीता आणि तत्वप्रचाराकरीता, सर्वात ऐक्य आणण्याकरीता सामुदायिक प्रार्थनेचे अत्यंत महत्व सांगितले. 'सत्यमेव जयते' ही भावना सर्वांच्या मनामनात जागृत व्हावी व संपुर्ण देश हा एकोप्याने एकमताने उभारल्या जावा हा देखील उद्देश सामुदायिक प्रार्थनेचा होता. यामुळे सामाजिक ऐक्य व सांस्कृतिक वारसा जनमानसात रुजल्या जाईल व सर्वांचे कल्याण होईल.

## भजन हेच माझे धन

वंदनीय महाराजांनी आपल सर्वश्रेष्ठ धन म्हणजे माझे भजन होय असे सांगितले आणि यासाठी माझे तन आणि मन कुर्बान करण्याची तयारी आहे. अशी स्वतःच साक्ष दिली आहे.

सबसे उंचा है धन, मेरा प्यारा भजन।
इसपे सारा तन-मन, कुर्बान रहेगा।
इससे ही मैने जीवन बनाया।
जंगल पहाडोमें ईश्वर रिझाया।
सारा जनम इसमें जायगा।
मुझे कोई ना छंद। सिवा प्यारे गोविंद।
इसपे सारा तन-मन कुर्बान रहेगा।

वंदनीय महाराजांच्या जीवनकलेत भजनाला विशिष्ट स्थान आहे. त्यांच्या भजनांनी गेल्या शतकातील पाच दशकात हजारो लोकांना प्रभावित केले, लाखो लोकांना आकर्षित केले. आपल्या भजनांनी मंत्रमुग्ध करणा-या राष्ट्रसंत, तुकडोजींना गायनाचा पहिला धडा मिळाला. चांदूर बाजारच्या मठात भारतीबुवांकडूनच यावलीत हनुमंतीबुवा सोबत महादेव मंदीरात राहत, खंजेरी वाजवत. लाखो लोकांना मंत्रमुग्ध करणा-या खंजेरी वादनाची कला बाळ माणिक हनुमंती बुवाकडूनच शिकले.

सन १९१९ मध्ये बाळ माणिक व मंजूळा माता वरखेडला आलेत. माणिकचे नाव पुन्हा वरखेडच्या शाळेत टाकले. बाळ माणिकचे मन पुर्णपणे भजन आणि किर्तनात विलीन झाले होते. त्याचे शाळेत मन रमते नव्हते तो वर्गातील सोबत्यांना घेवून कधी धृवाचे अध्ययन तर कधी गणपती उत्सवात प्रवचन, कथा, किर्तन, भजन करी. यातूनच ते असत्य आचरणाकडून सत्य आचरनाकडे जनमानसाला नेण्याचा प्रयत्न करीत असे.

भजन ही सामाजिक व धार्मिक जागृतीची संजिवणी आहे. बाणेदारपणाची धमक योजक शब्दांनी पुर्णपणे आपणात बाणावी व ती यंत्राप्रमाणे कार्यकारी व्हावी म्हणून जनात व मनात विचारांचे भाव प्रकट करायला लावणारे काव्य म्हणजे भजन होय. आपल्या भावना शक्तीच्या प्रभावी छायेमुळे अदृश्यरुपात प्रगट झालेल्या देवतेपुढे आपल्या वृत्तीचा प्रवाह काव्य स्फुर्तीने खेळविणे म्हणजे भजन होय. भजनाचा अर्थ स्वरात गुणगुणणे असा नसून सत्शब्दांच्या अर्थांकडे वळून अंतःकरणाला तेथे स्थिरावणे असा आहे. केवळ गीत गाणे म्हणजे भजन नसून त्यांच्या भावात रंगणे, अर्थबोधात बुडी घेणे आणि त्यातील तत्वे अमलात आणून तद्नुसार विश्व वैकुंठरुप समजून जनसेवा करणे हेच खरे भजन आहे.

वाईट भावना नासावया।
लोकी कर्तव्यशीलता यावया।
समाज सुस्थितीत नांदावया।
भजने केली संतानी।

समाज जीवनातील वाईट, दुषित भावनाचा नाश व्हावा, लोकात कर्तव्यशीलता वाढावी, समाज सुव्यवस्थितीत नांदावा याच हेतूने संतांनी भजने केली आहेत. म्हणून समाज ऐक्य निर्माण करणे, समाज जागृती निर्माण करणे हेचे भजनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

सर्वाभूती प्रेमभाव। यातून सेवांचा उद्‌भव।
चारित्र्याचा वाढे गौरव। संस्कार होता भजनाचे।

भजन हे लोकांवर उत्तम संस्कार घडवून आणणारे प्रभावी साधन आहे. भजनाच्या संस्कारातून प्रेमभावना वाढीस लागते. या प्रेम भावनेतून सेवेचा उद्‌भव व चारित्र्य निर्मिती होत असते हेच भजनाचे प्रयोजन आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा भजनाचा कार्यक्रम आहे ही बातमी समजताच परिसरातील हजारो लोक भजनाचे स्थळी आपोआपच जमा व्हायचे, कोणी पायदळ यायचे, कोणी रेंगी-छकड्यात, कोणी डमणीत, कोणी सायकलवरुन, तर कोणी जीप मोटारीत बसून राष्ट्रसंताचे भजन मोठ्या तन्मयतेने ऐकायचे. राष्ट्रसंतांनी भजन केवळ खेड्यापाड्यातच नव्हे तर पुणे, मुंबई, उज्जैन, इंदौर, दिल्ली, हरिव्दार, नागपूर, रायपूर, अलाहाबाद, अहमदाबाद अशा मोठ्या शहरातही भजने म्हटली व सामाजिक ऐक्याचा वारसा पुढे नेला. टोकियो, बँकॉक, रंगून अशा परदेशातील शहरातही हजारो श्रोत्यांना वंदनीय महाराजांच्या भजनाने, त्यांच्या खंजरी गायनाने मोहीत केले होते. १९५५ साली